नि.दि.दा.क्रं.०७/२०१९
अनुसया वि. शासन

नि.क्रं. ०१ खाली आदेश

प्रतिवादी क्रं. ५ यांनी दिलेला नि.क्रं.१४८ लगतचा अर्ज हा, " त्यांनी नि.क्रं.१४६ वरील आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केल्याने प्रकरण तहकुब करण्यासाठी होता”, तो नामंजूर झाला. आदेशामध्ये प्रतिवादी क्रं. ५ यांनी त्यांची उलटतपासणी पूर्ण करावी असे नमूद करण्यात आले. प्रतिवादी क्रं. ५ यांना साक्षीकामी साक्षपिंज-यामध्ये येण्यास सांगितले असता त्यांनी काल दिवसभर त्यांचा त्यांचे मुक्कामाचे ठिकाण ते औरंगाबाद येथील वकील यांच्यादरम्यान प्रवास झाला आहे. त्यामुळे त्यांना बरे वाटत नाही. तसेच त्यांचा रक्तदाब वाढला आहे असे सांगितले. साक्षीदाराचे वय शपथपत्रामध्ये ७९ वर्षे नमूद आहे. त्यांच्या वयाचा विचार करता त्यांनी साक्ष देण्यासाठी न्यायालयात न येता त्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी साक्ष नोंदविण्यासाठी कमिशन देण्याबद्दल न्यायालयाने त्यांना विचार बोलून दाखविला असता त्यांनी आपण औषधपाणी करुन सोमवारी न्यायालयात साक्षीला हजर राहू असे सांगितले. सदरचे प्रकरण मा.उच्च न्यायालयाने तातडीने निकाली करण्याचे निर्देश दिले असल्याने सोमवार दि.१६/०३/२०२६ रोजी साक्षीदार जनाबाई मोहनराव जगताप यांनी आपले वकीलांसह सकाळी ११वाजता न्यायालयात उलटतपास देण्यासाठी हजर रहावे. वादीच्या वकीलांनीही उलटतपास घेण्यासाठी सकाळी ११ वाजता न्यायालयात हजर रहावे. कोणत्याही कारणास्तव (मा.उच्च न्यायालयाच्या आदेश वगळता ) सदर प्रकरण सोमवारी तहकूब होणार नाही. साक्षीदार गैरहजर राहिल्यास त्यांचा या पूर्वी दिलेला जबाब पुराव्यात वाचला जाणार नाही,याची स्पष्ट जाणीव प्रतिवादी क्रं. ५ यांना करुन देण्यात येते. या आदेशासह प्रकरण १६/०३/२०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत पुढे ठेवण्यात येते.

स्वाक्षरीत/-

दिनांक १२/०३/२०२६. [एस.एन.सरडे]
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.